

संकल्प

वार्षिकांक २०१८-१९

संपूर्ण जगाला अहिंसेचा महान संदेश देणाऱ्या
महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त
त्यांच्या स्मृतीस समर्पित.....

अतुल विद्या मंदिर द्वारा संचालित

राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय

चांदूर रेल्वे, जि. अमरावती

NAAC Accredited with 'B+' Grade

Scanned by TapScanner

संपूर्ण विश्वाला अहिंसेचे महान संदेश देणाऱ्या महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतिस समर्पित

संकल्प

वार्षिकांक

२०१८-२०१९

* प्रकाशक -
प्राचार्य, राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे

* मुख्य संपादक -
डॉ. महेश चिखले
विभाग प्रमुख - प्राणीशास्त्र विभाग

* सह संपादक -
प्रा. कुलदीप सोळंके
प्रा. प्रविण चव्हाण

* संपादक मंडळ -
कु. दिपाली वानखडे (बी.एस्सी. भाग ३)
श्री. गौरव सोटे (बी.एस्सी. भाग ३)
कु. श्रध्दा खानझोडे (बी.एस्सी. भाग ३)

* मार्गदर्शक -
डॉ. गजानन संतापे,
Co-ordinator, IQAC

* मुखपृष्ठ, अक्षर जुळवणी व अंतर्गत सजावट -
श्री. श्रीकांत अ. जोशी

* मुद्रण स्थळ -
सान्वी बुक्स ॲन्ड झेरॉक्स, रुख्मिणी नगर, अमरावती

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
ते मत त्या त्या लेखकाचे समजावे.

Scanned by TapScanner

Atul Vidya Mandir, Wardha

Regd. No. MH. 871/91 & F-1335 Wardha

EXECUTIVE COMMITTEE

1)	Prof. Mrs. Uttaratai V. Jagtap	President
2)	Prof. Annasaheb alias Walmikrao Jagtap	Vice-President
3)	Dr. Milind W. Jagtap	Vice- President
4)	Prof. Virendrabhau W. Jagtap	Secretary
5)	Prof. Dr. Rajiv M. Jadhav	Joint-Secretary
6)	Mr. Parikshit V. Jagtap	Treasurer
7)	Mr. Sudhir V. Jagtap	Member
8)	Dr. Mrs. Varsha M. Jagtap	Member
9)	Mr. Gopal M. Choudhari	Member
10)	Mr. Miheer M. Jagtap	Member
11)	Mr. Dinesh N. Gharphalkar	Member

Scanned by TapScanner

अनुक्रमणिका

मराठी विभाग

१.	अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी	कु. श्रृतीका वानखडे	१
२.	आई वडिलांना कधी विसरू नका	कु. माधुरी र. वानखडे	२
३.	माय-बाप	कु. ऋतुजा रा. गोंगे	३
४.	कॉलेज कट्टा	कु. राखी कोठारी	४
५.	महात्मा मोहनदास करमचंद गांधी	गौरव किशोर सोटे	५
६.	युध्द आणि शांतता काळात भारत - पाकिस्तान	कु. दिपाली ध. वानखडे	७
७.	ध्येयनिश्चिती : आत्मविश्वास व प्रेरणा	कु. दिव्या प्र. सुरजुसे	९
८.	मनातील भाव	कु. राखी कोठारी	१०
९.	डॉ. सलीम अली	गौरव कि. सोटे	११
१०.	किनारा	कु. मोनिका सोनोने	१२
११.	बाबा	कु. माधुरी रमेश वानखडे	१३
१२.	स्वप्न आणि सत्य	कु. मोनिका सोनोने	१४
१३.	दु:ख	कु. राखी कोठारी	१४
१४.	राग काटकेसरीने कसा वापरा ?	कु. दिपाली वानखडे	१५
१५.	ग्रंथ वाचनाचे महत्व	कु. मयुरी विजय पाटणे	१७
१६.	स्वप्न	कु. सायली सा. कोठेकर	१८
१६.	जगदीशचंद्र बोस	गौरव कि. सोटे	१९
१७.	मुलगी	कु. दर्शना तिजारे	२०
१८.	आयुष्य	कु. दर्शना तिजारे	२०
१९.	काही राहीलं तर नाही नां	कु. तेजस्वीनी सु. ढोक	२१
२०.	गुरूचे महत्व	कु. प्रज्वली कांडलकर	२२
२१.	वडील	कु. मयुरी विजय पाटणे	२३
२२.	समजत नाही की मी घडलो की बिघडलो	कु. तेजस्वीनी सु. ढोक	२४
२३.	जनसामान्याचा युगप्रवर्तक - छत्रपती शाहू महाराज	कु. कोमल गावंडे	२५

Scanned by TapScanner

हिंदी विभाग

१.	महात्मा गांधी - सेवाग्राम आश्रम	कु. राखी कोठारी	२७
२.	वर्दी पहन के देख	कु. रोशनी वि. मेटे	२८
३.	शहीद	कु. रोशनी वि. मेटे	२८
४.	महात्मा गांधी	कु. आर. आर. घोंगे	२९
५.	पर्यावरण और महात्मा गांधी	अर्पित टाले	३४
६.	खुशियों से दूर होते जा रहे है हम.....	कु. रोशनी इंगोले	३५
७.	भ्रष्टाचार मुक्त भारत	कु. प्रतिक्षा शेंडे	३६

इंग्रजी विभाग

1.	Mahatma Gandhi	Ku. Vaishnvai R. Bhond	37
2.	INTERNET - THE BLACK SIDE	Gaurav Sote	39
3.	Mahatma Gandhi - Father of The Nation	Ku. Mayuri Patane	41

अहवाल

१.	रा.से.यो. विशेष श्रम संस्कार शिबीर	४३
२.	रा.से.यो. नियमित कार्यक्रम अहवाल	४५
३.	Department of Chemistry	48
४.	Department Of Botany	49
५.	IQAC Report	51
६.	Library Report	54
७.	Sports & Youth Festival Annual Report	55
८.	State Level Three Days Workshop	56
९.	Department of Zoology	58

Scanned by TapScanner

आमचे प्रेरणास्थान



मा. प्रा. अण्णासाहेब उर्फ वाल्मीकराव जगताप

संस्थापक अध्यक्ष


अतुल विद्या मंदिर (वर्धा)

Scanned by TapScanner

अतुल विद्या मंदिर (वर्धा) द्वारा संचालित

राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे

आदरांजली



स्व. अतुल वा. जगताप

एम.कॉम., एम.बी.ए.

Scanned by TapScanner

महाविद्यालयाचे आधारस्तंभ




मा.प्रा.अण्णासाहेब उर्फ वाल्मीकराव जगताप



मा.प्रा.सौ. उत्तराताई वी. जगताप
अध्यक्षा



मा.डॉ.मिलिंद वा.जगताप
उपाध्यक्ष



मा.प्रा.वीरेंद्र वा. जगताप
सचिव



मा.श्री. परिक्षीत जगताप
कोषाध्यक्ष

Scanned by TapScanner



महात्मा गांधी यांना विन्रम अभिवादन....

शुभसंदेश....

राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने महात्मा गांधी यांना समर्पित 'संकल्प' वार्षिक विशेषांक प्रकाशित होत असल्याबद्दल विशेष आनंद होत आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेता म्हणून महात्मा गांधीजींची ओळख आहे. २०१९ हे वर्षे त्यांच्या १५० वे जयंती वर्षे आहे. संपूर्ण जगाला अहिंसेची शिकवण देणारे महात्मा गांधी हे आचाराने तेवढेच सात्विक व संत प्रवृत्तीचे होते. त्यांनी आफ्रिकेमध्ये असतांना निग्रोकरीता राबविलेल्या आंदोलनाची चर्चा संपूर्ण जगात झाली होती. १९२० पासून भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व त्यांनी केले.

इंग्रजी जुलमी सत्तेला हिंसेने उत्तर देणे हे त्यांना मान्य नव्हते. आपल्यातील आत्मिक शक्तीच्या जोरावर शत्रुला परास्त करण्याची शक्ती गांधीजींच्या सर्वच आंदोलनामध्ये होती. त्यांनी देशांतर्गत सर्व समूहाच्या अडचणी गोलमेज परिषदेद्वारा इंग्रजांसमोर ठेवल्या. असहकार चळवळ, चले जाव आंदोलन, दांडी सत्याग्रह, अशा अनेक चळवळीचे नेतृत्व गांधीजींनी केले. त्यांनी आपल्या जगण्यामधूनही मौलिक असा संदेश दिला आहे. स्वच्छता हे त्यांच्या जगण्यातील महत्वाचे मूल्य होते. मनाची स्वच्छता व बाह्य स्वच्छता या दोनही स्वच्छते संदर्भात त्यांचे संदेश लोकप्रिय असून आज त्यांच्या संदेशाची विद्यार्थ्यांना व समाजाला गरज आहे.

संकल्प या वार्षिकांकाच्या माध्यमातून विद्यार्थीवर्ग ज्ञान, विज्ञान व संशोधकवृत्ती ठेवून आपल्या लेखनीतून साहित्याची निर्मिती करतो. यामुळे मनस्वी आनंद होतो आहे. म्हणून या विशेषांकाला शुभसंदेश अभिव्यक्त करीत आहे. तसेच स्टीफन हॉकींग यांना विनम्र अभिवादन.




Jagtap

(प्रा. सौ. उत्तराताई वी. जगताप)
अध्यक्षा, अतुल विद्या मंदिर, वर्धा

Scanned by TapScanner

प्राचार्यांचे मनोगत.....



आपल्या महाविद्यालयाला समकालीन कालप्रवाहाशी सुसंगत ठेवण्यासाठी मागील वर्षभरात राबविलेल्या उपक्रमांना सतत प्रेरणा देणारे संस्थेचे आधारवड आदरणिय अण्णासाहेब जगताप, संस्थेचे सचिव माननीय प्रा. विरेंद्रभाऊ जगताप, संस्थेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा प्रा. सौ. उत्तराताई जगताप व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे मी मनापासून आभार मानतो.

प्रगतीचा ध्यास घ्यावा व टाकलेले पाऊल पुढेच पडत जावे अशा यशाचा निखळ आनंद या महाविद्यालयाच्या प्रत्येकाने यावर्षी घेतला.

या शैक्षणिक सत्रात महाविद्यालयाच्या आधीच भव्यदिव्य असलेल्या वास्तूला अधिक देखणे रूप प्राप्त झाले आहे. सर्व प्रशासकीय व्यवहारात नेटकेपणा आलेला आहे. प्रत्येक शिक्षक एक नव्या दृष्टिने विद्यार्थ्यांकडे पाहता झाला. ग्रामीण पार्श्वभूमी असलेले माझे विद्यार्थी मित्र एका नव्या ध्यासाने प्रेरित झाले. आपण सरस आहोत हा नवा आत्मविश्वास त्यांना मिळाला. ते बोलते झाले आहे. अभ्यासक्रमाशी निगडीत उपक्रम असोत की इतर कला व खेळ, माझ्या विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतही सहभाग घेवून आपली चुणूक दाखविलेली आहे.

मागील संपूर्ण सत्राचा आढावा घेतांना आणि महाविद्यालयाची यशोगाथा आपल्या समोर मांडतांना मी अत्यंत समाधानी असलो तरी तुर्तास एवढेच म्हणेन....

साहसास मम सीमा नसली
नवीन क्षितीजे पुन्हा खुणवती
दूर दाटला निविडात मांडला
पुन्हा नवा मी डाव

डॉ. सुरेशचंद्र स. ठाकरे
प्राचार्य

Scanned by TapScanner

संपादकीय .....



डॉ. महेश चिखले
मुख्य संपादक



प्रा. कुलदीप सोळंके
सह-संपादक



प्रा. प्रविण चव्हाण
सह-संपादक



कु. दिपाली वानखडे
बी.एस्सी. भाग ३



गौरव सोटे
बी.एस्सी. भाग ३

कु. श्रध्दा खानझोडे
बी.एस्सी. भाग ३

प्रिय विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो .....

अतुल विद्या मंदीर वर्धा द्वारा संचालित राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिकांक 'संकल्प' रसिक वाचकाच्या स्वाधीन करतांना अत्यानंद होत आहे. आमचे महाविद्यालय ग्रामीण भागात आहे. परंतु या ग्रामीण मनाचा ठाव घेऊन त्याला आपल्या साहित्यातून लेखनबद्ध करण्याचा प्रयत्न वार्षिकांकामधून केला आहे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाची कास धरून विद्यार्थी घडविण्याचा तसेच त्यांचा सर्वांगिण विकास करण्याच्या हेतूने आमची संस्था कार्यरत आहे. संस्थेचे पदाधिकारी संस्थापक अध्यक्ष प्रा. अण्णासाहेब जगताप, सचिव मा. आ. प्रा. विरेंद्रभाऊ जगताप, मा. अध्यक्षा प्रा. उत्तराताई वि. जगताप यांच्या अथक प्रयत्नातून हे स्वप्न साकार झालेले आहे.

विद्यार्थ्यांच्या भावभावनांचे प्रतिबिंब असणारा हा वार्षिकांक त्यांचे विचार, कला, संस्कृती, राष्ट्र, शिक्षण, समाज अशा अनेक अष्टपैलू विचारमंथन करणारी साहित्यकृती मांडली आहे. सभोवतालचा परिसर, ऐतिहासिक, भौगोलिक, अध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन साकारणारी मूल्यात्मक साहित्य लिहिले आहे. साहित्य निर्मितीची प्रेरणा घेऊन मराठी-इंग्रजी-हिन्दी अशा विविध भाषेतून आपले विचार, भाव-भावना अभिव्यक्त केले आहे. जीवन जगतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यातून मानवी समाजाचे, वर्तनाचे पैलू आत्मचिंतन करायला लावणारे असतात. सामाजिक समस्या, स्पर्धा, राजकारण, भ्रष्टाचार, स्त्रियांची सद्य:स्थिती असे अनेक जिव्हाळ्याचे विषय हाताळले आहे.


संकल्प वार्षिकांक विद्यार्थ्यांच्या सुप्त सृजनशिलतेला फूलण्याची, बहरण्याची संधी देणारं व्यासपीठ आहे. सभोवतालच्या प्रसंगातून, समाजजीवनातून घेतलेले विविध अनुभव विचारांचे बीज अंकुरण्यास मदत करतात आणि त्यातून साकार होतात. विचारांची मालिका त्या मालिकांची गुंफण म्हणजे संकल्प वार्षिकांक होय. पर्यावरण, विज्ञान, समाज अशा विषयाला हात लावून अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे कार्य यातून झाले आहे. या वार्षिकांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे विचार, जाणिवा, वाचक वर्गापर्यंत पोहचण्याचा हा प्रयत्न आहे.

'संकल्प' हा वार्षिकांक अधिक आकर्षक व वाचनीय व्हावा यासाठी विद्यार्थ्यांचे भरपूर सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस.ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. या वार्षिकांकासाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मौलिक सहकार्य अतुलनीय आहे. याशिवाय हे कार्य पूर्णत्वास गेले नसते. या सर्वांचे आभार मानण्याच्या औपचारिकतेपेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यात आम्हाला अधिक धन्यता वाटेल. श्रीकांत जोशी, सान्वी बुक्स अॅन्ड झेरॉक्स, अमरावती यांनी संगणकीय काम वेळेत पूर्ण करून दिले तसेच अक्षर जुळवणी केल्याबद्दल त्यांचे सुध्दा आभार !

संपादक मंडळ

Scanned by TapScanner

मराठी
विभाग




Scanned by TapScanner

अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी



कु. श्रृतीका वानखडे
बी.एस्सी. भाग २

'गांधी नावाची हाडामांसांची व्यक्ती अस्तित्वात होती, यावर नवीन पिढीला विश्वासच बसणार नाही. कारण असा आदर्श पुरुष पुन्हा होणे नाही' असे सुप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आईन्सस्टाईन,म्हणाले होते. त्या काळात एका वैज्ञानिकाच्यादृष्टीने गांधींचे महत्त्व विषद केले होते. आजच्या काळातही अमेरिकासारख्या बलाढय़ राष्ट्राचे माजी प्रमुख बराक ओबामा हे सुद्धा गांधींना त्यांचे आदर्श मानतात. यातूनच गांधी विचाराची व्याप्ती स्पष्ट होते. ग्रामस्वराज्य असो की ग्रामोद्योग, व्यक्तिगत आचरण असो की राहणीमान, पर्यावरण, आरोग्य, सर्वधर्म समभाव, एक नव्हे तर अनेक विषयांवर त्यांनी मांडलेली मते आजच्या बदलत्या काळात सुसंगत असल्याचे दिसून येते.



केंद्र आणि राज्य शासनाशी संबंधित विद्यापीठांमध्ये जरी गांधी विचाराला तेवढे महत्त्व दिले जात नसले तरी देशभरातील अनेक खासगी विद्यापीठांनी मात्र त्यांच्या अभ्यासक्रमात या विषयाचा समावेश केला आहे. विशाखापट्टणममधील 'गीतम' या खासगी विद्यापीठात 'गांधी विचार' हा विषय शिकवला जातो. याशिवाय अनेक विदेशी विद्यापीठातही स्वतंत्रपणे हा विषय शिकवला जात आहे. पर्यावरण रक्षण आणि संवर्धनाबाबत संपूर्ण देश आता वेगवेगळे प्रयोग करू लागले आहेत. मात्र, गांधींनी अनेक वर्षांपूर्वीच त्याचे महत्त्व समजून याबाबत मौलिक विचार मांडले आहेत. सेवाग्राम आश्रमात राहात असताना त्यांनी शाश्वत जीवनशैली स्वीकारली होती. शौचालय साफ करणे, स्वत: पेरलेल्या अन्नधान्याचा वापर करणे आदीचा त्यात समावेश होता. मानव आणि वन्यप्राणी यांचे परस्पराशी निगडित नाते त्यांनी सांगितले होते. ग्रामस्वच्छता -ग्राम स्वच्छतेचे महत्त्व त्यांनी त्या काळातच ओळखले होते आणि त्याची सुरुवात त्यांनी स्वत:पासून केली होती. आज हे सूत्र स्वीकारून देश-विदेशात स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. भारतात विद्यमान सरकारने तसेच त्यापूर्वीच्या राज्यातील सरकारने वेगवेगळ्या पद्धतीने पण गांधीजींच्याच स्वच्छतेच्या मंत्राचा आधार घेऊन मोहीम सुरू केल्या आहेत. महात्मा गांधी यांनी व्यक्तिगत जीवनासाठी 'एकादश' व्रत दिले होते. प्रत्येकाने त्याचे पालन करावे, असे त्यांचे मत होते. त्यात प्रामुख्याने सत्य, अहिंसा, शरीरश्रम, आस्वाद, शरीरश्रम, ब्रम्हचर्य, अपहिग्रह, सर्वधर्म समभाव, स्वदेशी, स्पर्शभावना आणि सर्वत्र भय वर्जन आदींचा समावेश आहे. हे सूत्र प्रत्येकाने पाळायचे प्रयत्न केल्यास समाजातील वाईट भावना दूर होतील, असे गांधी म्हणत.

सत्य-अहिंसेची अनुभूती खेडय़ातील जीवनातून मिळू शकते, असे गांधीजी म्हणत, पण आज खेडी ओस पडून शहरात गर्दी वाढू लागली. शहर विकास तज्ज्ञांच्या मते २०५० पर्यंत जगातील ६० टक्के जनता ही शहराकडे वळेल. त्याचा परिणाम पाणी पुरवठा, स्वच्छता आणि पर्यायाने पर्यावरणावरही होईल. त्यातून प्रदूषणही वाढेल. हे टाळण्यासाठी गांधीजींनी कुटीर उद्योग, ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध करण्यावर भर दिला होता. त्यामुळे गांधी हे आद्य पर्यावरणवादी होते, असे मला वाटते.

Scanned by TapScanner

आई वडिलांना कधी विसरू नका

विसरा सर्वांना पण आई-वडिलांना कधी विसरू नका ।
अनंत उपकार आहेत त्यांचे, ही गोष्ट कधी विसरू नका ।।

पाषाण पुजलेत त्यांनी अनेक, अरे तुमच्या जन्मासाठी ।
पाषाण बनुन आई-वडिलांचे हृदय कधी तुडवू नका ।।

मुखातील घास काढून अरे ज्यांनी तुम्हाला मोठे केले ।
अमृत पाजिते तुम्हाला, तुम्ही त्यांच्यासाठी विष ओकू नका ।।

किती केले गोड-कौतुक, इच्छाही तुमच्या पूर्ण केल्या ।
पूर्ण करा इच्छा त्यांच्या, ही गोष्ट कधी विसरू नका ।।


लाखो कमावित असाल तुम्ही, पण आई वडिलांपेक्षा जास्त नाही ।
सेवेवाचून सर्व राख आहे तुम्ही गर्वाने कधी फुगु नका ।।

मुलांकडून सेवा इच्छिते, तर मुलगा बनून सेवा करा ।
जसे करावे तसे भरावे, हा न्याय कधि विसरू नका ।।

स्वत: ओल्यावर झोपूनही, झोपविले तुम्हास कोरड्या जागी ।
आईच्या त्या प्रेमळ नेत्रामध्ये चुकुन अश्रु आणु नका ।।

जिने फुले आच्छादिली होती, क्षणोक्षणी तुमच्या मार्गात ।
त्या मार्गदर्शकाच्या मार्गातील तुम्ही काटे बनू नका ।।

पैसा तर चिक्कार मिळेल, पण आई - वडिल काय मिळणार कधी ।
क्षणोक्षणी त्या पावन चरणाचा आदर करणे विसरू नका ।।



कु. माधुरी र. वानखडे
बी.एस्सी. भाग ३

Scanned by TapScanner

माय-बाप




कु. ऋतुजा रा. गोंगे
बी.एस्सी भाग ३

आज हजारो किलोमिटरवर बसलेल्या मित्रांशी तासंनतास गप्पा करायला आजच्या मुलांना वेळ आहे. पण घरी बसलेल्या आई-वडिलांची तब्येत विचारायले त्यांच्याकडे वेळ नाही.

लक्षात ठेवा तुम्ही आजारी असतांना तो तुमचा मित्र काळजी घे म्हणून झोपी जाईल पण तुमच्यासाठी दुधाचा ग्लास अन बिस्किटचा पुडा घेऊन येते ना ती फक्त तुमची आई असते. अन् अर्ध्या रात्री तुमच्या गळ्याला हात लावून बघतो ना तो तुमचा बाप. ज्याले माय-बाप कळले त्याले वेद कळले. ज्याले कळला बाप त्याले कळला विठोबा. अन् ज्याले कळली आई त्याले कळली रखुमाई.

कोणाला डोळे झाकतास सुंदरा दिसते, कोणाला रंभा, वसुंधरा दिसते. नवनाटकी जगास नजाने काय काय दिसते. मी डोळे झाकतास राबनारी माय दिसते.

माय माय च संसारिक ज्ञान बघत गेली त्यात मनाचा अहंकार पुसत गेला. अन् सतत चालणाऱ्या बापाच्या पायाच्या भेगाईत मले यशाचा मार्ग दिसत गेला.



अरे गुदगुदुन हसतांना डोळे ओले करणारी माय, दु:खाचा डोंगर झेलतांना सुखाचा झरा तिनच निर्माण करावा.

अन् आखुड पँट अन् चप्पल घालून जग जिंकल्याचा अभिमान माया बापानच बाळगावा...

दु:खातून सुखाचे क्षण पाखडायला अन् गवसलेल्या क्षणात जीवन जगायला मले माया मायन शिकवला. अन १०० रूपयाचे फाटके कपडे घालून करोडो रूपयाची इज्जत कशी कमवावी हे मले माया बापानं शिकवलं.

पाच पन्नास हजार कधी मोजले नाही. त्यात हातान त्या माया बापाच्या हातात मले संकटातून सावरण्याची ताकत आहे. अन आईत गायलेल्या प्रत्येक रागात मले झोपवण्याची ताकद आहे.

भगवद् गीतेचा अन माया मायचा कधी संबंध आला नाही पण कर्मण्य अधिकार असतो हा श्लोक ति दररोज जगते. अन् कोण म्हणजे मानुस नशिबाच्या माग लागतो. माया बाप उठल्यापासून नशिब बदलण्यासाठी जगतो अन् हे बावळट नशिब दररोज त्याच्या माग लागते.

कोणी म्हणे मायं बाप आमदार आहे. कोणी म्हणे माया बाप खासदार आहे. अन् कोणी म्हणे माया बाप जहागिरदार आहे. छाती फुटेपर्यंत हा पठ्ठा सांगत असतो माया बाप इमानदार आहे. मानल कि आमचा बाप आम्हाले गरिबित पोसतो. पण आम्हालेच माहीत आहे तो त्यासाठी काय काय सोसतो.

असतील लखपती, करोडपती या जगात पण हसून दाखवा आनंदात जसा माया बाप दु:खात असतो. कितीतरी सुंदर चेहरे हजारे नजारे पाहिले असतील काळवंडलेल्या डोळ्यात मायच्या पण घमंड आहे मले की आजही माया चेहरा तिला संगळ्यात सुंदर दिसतो.

अरे मातीच घर, मातीच आंगण, मातिची चूल अख्ख आयुष्य माया मायन मातितच कालवल. लोक म्हणतही असतील बापाले काय तुवा गमावल. अरे गमावल कसा अख्ख आयुष्य माया बापान मानुस बनण्यातच घालवलं.

शेवटी नामजप करायले, पुजा अर्चा करायले वेळच नाही माया माय ले, तरी तिच्या मनात मले खरा ईश्वरप्रती भाव दिसतो. अन मंदिरात जान सोडल रे मी बि कारण उन्हात काळवंडलेल्या माया बापाच्या पाठीवरच मले संध्याकाळी देव दिसतो.

शेवटी याच माय बापाच नामस्मरण करत मले मरण येऊ दे. अन् दम असल देण तर हा चमत्कार होऊ दे. तो स्वर्ग तो मोक्ष तुझा तुलाच राहु दे. पुन्हा फक्त एकदा त्याच मायबापाच्या पोटी जन्म घेऊ दे.

* * *

Scanned by TapScanner

कॉलेज कट्टा

वर्षाच्या या शेवटी, का ओढ मनाला लागे ?
मित्र मैत्रिणीचा सहवास का जिवाला हवाहवासा वाटे ?

आभास दूर जाण्याचा मनाला का छळे ?
या कॉलेज कट्ट्याला कसे विसरू गडे ?

ज्या क्षणी आली येथे, भारावून गेली
न कळत या सवंगडींशी हरवून मी गेली.

सूर्याच्या किरणाप्रमाणे शिक्षकांनी ज्ञान दिले
या ज्ञानाच्या वाटेवरूनी हसत मी चालीले

वाट बदलली ध्यास बदलला, अश्रू डोळ्यांतून निघे
तीन वर्षांचा हा सहवास जीवनात कधी न विसरे

ओढ लागली या जिवाला, छंद लागला या मनाला
भास होतोय या हृदयाला पुन्हा रमाव या कॉलेज कट्ट्याला.



कु. राखी कोठारी
बी.एस्सी. भाग २

Scanned by TapScanner

महात्मा मोहनदास करमचंद गांधी

जन्म - २ ऑक्टोबर १८६९,
पोरबंदर, काठियावाड, ब्रिटिशभारत
मृत्यु - जानेवारी ३०, १९४८ नवी दिल्ली, भारत
चळवळ - भारतीय स्वातंत्र्य लढा
संघटना - अखिल भारतीय काँग्रेस
पत्नी - कस्तुरबा गांधी



गौरव किशोर सोटे
बी.एस्सी. भाग ३

महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधीजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना 'महात्मा' (अर्थ - महान आत्मा) ही उपाधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना अनधिकृतपणे भारताचे राष्ट्रपिता म्हटले जात. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधले, असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांना जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते.

असहकार आणि अहिंसेच्या तत्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये, तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. गांधीनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्वांचा पुरस्कार केला, स्वत:ही याच तत्वांनुसार जगले आणि इतरांनाही तसे करावे असे सुचविले. त्यांनी खेड्यांना खऱ्या भारताचे मुळ म्हणून पाहिजे आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला.

सुरूवातीचा काळ -

महात्मा गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर, इ.स. १८६९ या दिवशी गुजरातमधील पोरबंदर शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई होते. करमचंद गांधी तत्कालीन काठेवाड प्रांतातील पोरबंदरमध्ये दिवाण होते. त्यांच्या आजोबांचे नाव उत्तमचंद गांधी असे होते. पुतळीबाई या करमचंद यांच्या चौथ्या पत्नी होत्या. आधीच्या तीन पत्नी प्रसुति दरम्यान मृत पावल्या होत्या. करमचंद हिंदू मोघ समाजातील होते तर पुतळीबाई वैष्णव समाजातील. अत्यंत धार्मिक वातावरणातील बालपणाचा मोठा प्रभाव गांधीजींच्या पुढील आयुष्यावर दिसून येते.

विशेषत: अहिंसा, शाकाहार, सहिष्णुता, इतरांबद्दल करूणा या तत्वांचे बीज याच काळात रोवले गेले. जैन धार्मिक असलेल्या आईमुळे मोहनदासवर जैन संकल्पना आणि प्रथांचा प्रभाव होता. प्राचीन वाङ्मय यातील यातील श्रावणबाळ आणि हरिशचंद्र या दोन कथांचा मोहनदासच्या मनावर खोलवर परिणाम होता.

इ.स. १८८३ मध्ये वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा कस्तुरबा माखनजी यांच्या बरोबर बालविवाह झाला. त्यांचे नाव लहान करून कस्तुरबा (आणि प्रेमाने बा) असे घेतले जाई. पण त्या काळातील प्रथेनुसार कस्तुरबा बहुतांश काळ त्यांच्या वडिलांच्या घरीच होत्या. या प्रक्रियेत मोहनदासला शालेय शिक्षणाचे एक वर्ष गमवावे लागले. इ.स. १८८५ मध्ये जेव्हा गांधीजी १५ वर्षांचे होते तेव्हा दांपत्यांना पहिले अपत्य झाले. पण ते खुप कमी काळ जगले. त्याचवर्षी आधी वडिल करमचंद गांधींचा स्वर्गवास झाला होता. पुढे गांधीजी आणि कस्तुरबा यांना अजून चार मुले झालीत. इ.स. १८८८ मध्ये हरिलाल, इ.स. १८९२ मध्ये मणिलाल, इ.स. १८९७ मध्ये रामदास आणि इ.स. १९०० मध्ये देवदास.

बॅरिस्टर -

शालेय शिक्षण संपवून वयाच्या एकोणविसाव्या वर्षी इ.स. १८८८ मध्ये ते इंग्लंडमध्ये लंडनला वकिलीचे शिक्षण घेण्यास गेले. तेथे त्यांनी इनरटेंपल या गावी राहून बॅरिस्टर घेण्यासाठी भारतीय कायदा आणि न्यायशास्त्राचा अभ्यास केला. इंग्लंडला जाण्याआधी त्यांनी आईला जैन साधूच्या उपस्थितीत आपण मांस, बाई व दारू यापासून दूर राहु असे वचन दिले होते. त्याचे त्यांनी तिथे पालन केले. परंतु लंडनमधील शाकाहारी जेवणाची चव त्यांना आवडली नाही. आणि लंडनमधील दुर्मिळ असलेली एक भारतीय खानावळ त्यांना सापडेपर्यंत ते बऱ्याच वेळा उपाशी राहात असे.

गांधीजींनी तेथे इंग्रजी चालीरिती ग्रहण करण्याचा प्रयत्न केला. उदा. नर्तनाची शिकवणी लावणे. ते इंग्लंडमध्ये शाकाहारी संस्थेचे सदस्य बनले आणि लवकर

Scanned by TapScanner

त्या संस्थेच्या अध्यक्षपदी पोहोचले.

इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास करून ते बॅरिस्टर बनले आणि हिंदुस्थानात परत येऊन वकिली करू लागले. १८९१ मध्ये ते इंग्लंड सोडून परत भारतात आले. भारतात आल्यावर कळले की त्यांच्या आईचा ते लंडनमध्ये असतांनाच स्वर्गवास झाला आहे. आणि त्यांच्या कुटुंबाने ही बातमी त्यांच्यापासून लपवून ठेवली. मुंबईमध्ये कायद्याची प्रॅक्टिस करण्याची त्यांची योजना यशस्वी झाली आहे. कारण ते कोर्टात बोलण्यासाठी अतिशय लाजाळू होते.

चंपारण्य आणि खेडा –

गांधीजींना पहिले मोठे यश १९१८ मध्ये चंपारण्य आणि खेडामधील सत्याग्रहात मिळाले. चंपारण्य बिहारमधील जमिनदार, जे प्रामुख्याने ब्रिटिश होते, स्थानिक शेतकऱ्यांना सक्तीने नील उत्पादन करायला लावत असत. त्यांना योग्य मोबदला पण मिळत नसे. यामुळे ते सतत गरिबीत असत. शेतकऱ्यांची गावे अत्यंत घाणेरडी आणि आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक ठेवली जात.

तसेच दारू, अस्पृश्यता, पडदा पद्धत अशा अनेक समस्या या गावांमध्ये होत्या. यावर भर म्हणजे तेथील दुष्काळ. पण इंग्रजांनी तरीही अनेक जाचक कर लादले होते आणि ते वाढतच होते. गुजरामधील खेडामध्येसुद्धा स्थिती काही वेगळी नव्हती. गांधीजींनी तिथे एक आश्रम उभारला. तिथे त्यांनी त्यांच्या लहान-मोठ्या सर्व अनुयायांना एकत्र केले. त्यांनी त्या भागातील परिस्थितीची माहिती गोळा केली व तिचा सखोल अभ्यास केला.

गावकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांनी गावाच्या स्वच्छतेचे तसेच शाळा, रूग्णालयाच्या बांधकामाचे काम हाती घेतले. याचसोबत गावातील प्रमुखांना अनिष्ट प्रथा नष्ट करण्यास प्रवृत्त केले. जेव्हा पोलिसांनी त्यांना प्रदेशात अशांतता निर्माण करण्याच्या गुन्ह्याखाली अटक केली व तो भाग सोडून जाण्यास सांगितले, तेव्हा गांधीजींचा प्रभाव जाणवून आला. हजारो लोकांनी या अटकेचा विरोध केला. त्यांनी गांधीजींच्या सुटकेसाठी तुरूंगाबाहेर पोलिस स्थानकासमोर आणि न्यायालयासमोर मोर्चेकाढले.

आंदोलना दरम्यान गांधीजींचा उल्लेख लोक 'बापू' आणि 'महात्मा' म्हणून करू लागले. खेडामध्ये सरदार पटेलांनी शेतकऱ्यांच्या बाजूने इंग्रजांसोबत वाटाघाटी केल्या. त्यानंतर कर रद्द करण्यात आला आणि सर्वांची तुरूंगातून सुटका करण्यात आली. या आंदोलनामुळे गांधीजींची प्रसिद्धी सर्व भारतभर पोहोचली.

असहकार –

गांधीजींनी असहकार, अहिंसा आणि शांततामय विरोध यांना शस्त्र म्हणून इंग्रजांविरूद्ध वापरले. पंजाबमध्ये जालियनवाला बाग हत्याकांडनंतर लोकांच्या क्रोधाचा उद्रेग झाला आणि अनेक ठिकाणी हिंसक विरोध झाले. गांधीजींनी जालियनवाला बाग हत्याकांड तसेच त्यानंतरचे हिंसक विरोध दोन्हींचा निषेध केला. त्यांनी या दंग्यांत बळी पडलेल्या ब्रिटिश नागरिकांबद्दल सहानुभूती दर्शविणारा आणि दंग्याचा निषेध करणारा एक ठराव मांडला.

असहकार चळवळीला समाजातील सर्व स्तरांमधुन उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला पण असहकार चळवळ जोमात असतांनाच अकस्मात थांबविण्यात आली. याला कारण ठरले, उत्तर प्रदेशमधील चौराचौरी गावात चळवळीला मिळालेले हिंसक वळण. ४ फेब्रुवारी १९२२ रोजी पोलिसांनी जमावावर केलेल्या गोळीबाराने संतप्त आंदोलकांनी पोलिसांवर हल्ला केला व नंतर पोलीस ठाण्याला आग लावली. जमावावरील गोळीबारात तीन जण मरण मावले तर पोलीस ठाण्यात २३ पोलीस मरण पावले. पुढे अजुन जास्त हिंसक घटना घडतील या भितीने गांधीजींनी चळवळ स्थगित केली. १० मार्च इ.स. १९२२ मध्ये गांधीजींना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली व सहा वर्षाचा तुरूंगवास ठोठावण्यात आला. इ.स. १९२४ मध्ये दोन वर्षांच्या तुरूंगवासानंतर अपेंडिक्सच्या ऑपरेशनच्या कारणावरून त्यांची सुटका करण्यात आली.

गांधीजींनी लिहिलेली पुस्तके –

१) Indian Home Rule (हिंद स्वराज्य)
२) गांधीजींची संक्षिप्त आत्मकथा
३) गांधीजींचे जीवन त्यांच्या शब्दात
४) गांधी विचार दर्शन : अहिंसा विचार
५) गांधी विचार दर्शन : राजकारण
६) गांधी विचार दर्शन : सत्याग्रह प्रयोग
७) गांधी विचार दर्शन : सत्याग्रह विचार
८) गांधी विचार दर्शन : सत्याग्रहाची जन्मकथा
९) गांधी विचार दर्शन : हरिजन
१०) नैतिक धर्म
११) माझ्या स्वप्नांचा भारत

गांधीजींवरील पुस्तके –

१) अखंड प्रेरणा गांधी विचारांची (डॉ. रघुनाथ माशेलकर)
२) अस्त गांधीयुगाचा आणि नंतर (अनंत ओगले)

* * *


Scanned by TapScanner

युध्द आणि शांतता काळात भारत - पाकिस्तान



कु. दिपाली ध. वानखडे
बी.एस्सी. भाग ३

भारत आणि पाकिस्तान राष्ट्राचे दोन तुकडे, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक साम्यस्थळे असली तरी गेल्या ५० वर्षाच्या काळात हल्ला-प्रतिहल्ला कुरापती संशय, गैरसमज व द्वेष यामुळे या देशांचा इतिहास सर्वश्रृत आहे. लष्करशाही व लोकशाहीमुळे पाकिस्तानमध्ये निर्माण होणाऱ्या अस्थिर परिस्थितीचे भूत भारताच्या मानगुटीवर कायम बसलेले आहे. दहशतवादी कारवाईने भारतात १९८९ च्या काळात जोर धरला. तेव्हापासून पाकिस्तानमधील संबंधात अधिक कटुता आली. १९९९ मध्ये दोन्ही देशांमध्ये सामंजस्य चर्चा सुरू झाली. मात्र कारगील युद्ध, भारतीय विमानाचे काठमांडु येथून अपहरण, संसदेवरील हल्ला या घटनांनी पाकिस्तानची बाजु लक्षात झाली. शांतता आणि युद्ध काळात या देशांमधील ताणतणाव संबंध कसे होते, त्यात कसे बदल होत गेले याचे चिंतन जे.एन. दिक्षित यांनी 'युध्द आणि शांतता काळात भारत पाकिस्तान यामध्ये केले आहे. आणि आता परत भारत आणि पाकिस्तान यांचे युद्ध चालुच आहे.



आता २०१९ मध्ये पाकिस्तानच आता अस चालु आहे. कुत्र्याचं शेपुट वाकडच ! असा वाक्प्रचार आपल्याकडे आहे. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे पाकिस्तानचे भारताशी असलेले संबंध. भारताने उभय देशांतील संबंध सुरळीत करण्याचा प्रयत्न कितीही केला तरिही पाकिस्तान वाकडेपणातच शिरण्याचा प्रयत्न करतो. युद्ध काळ असो की शांतता काळ, सत्तेवर कोणीही येवो, पाकिस्तानच्या धोरणात काहीही फरक पडत नाही. भारताशी वाकडेपणानेच वागण्याच त्या देशाची निती आहे. फाळणीपासून आतापर्यंत पाकिस्तानचा हाच कडवटपणा भारताला अनुभवास आला आहे, येत आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध कसे आहेत, याचे सडेतोड विश्लेषण करणारे पुस्तक भारताचे माजी परराष्ट्र सचिव व पाकिस्तानसह अनेक देशात वरिष्ठ राजनैतिक मुत्सद्दी म्हणून जबाबदारी कुशलपणे पार पाडलेले जे.एन. दिक्षित यांनी लिहिले आहे. 'युद्ध आणि शांतता काळात भारत-पाकिस्तान' असे आत्ताच्या या वागण्याचा म्हणता येईल.

भारत आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे १९४७ मध्ये निर्माण झाली. परंतु 'जम्मु-काश्मिर घेतल्याशिवाय फाळणीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही' असे पाकिस्तानचे ठाम मत आहे. शिवाय ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारतात अनेक ठिकाणी मोगलांचे राज्य होते. त्यामुळे फाळणीनंतर पाकिस्तानच भारतापेक्षा मोठे राष्ट्र बनले पाहिजे हा अट्टाहास पाकिस्तानी नेत्यांचा होता.

पाकिस्तानमध्ये लष्करशाही, हुकुमशाही वा लोकशाही असो आणि या शासन यंत्रणेचे कोण प्रमुख बनो, पाकिस्तानच्या या धोरणात बदल होत नाह आणि पुढेही होणार नाही, हे लेखकाने अनेक प्रसंग व उदाहरणे देऊन स्पष्ट केलेले आहे. भारत आणि हिंदु समाज यांच्याविषयी पराकोटीचा वैरभाव पाकिस्तानातील प्रत्येक सरकार जोपासत आले आहे. हिंदु आणि भारतद्वेषाचे पीक

Scanned by TapScanner

सातत्याने उत्पन्न करण्याचे धोरण प्रत्येक राजवटीने राबविले असून त्यास सौदी अरब आणि इतर मुस्लिम राष्ट्रांनी पद्धत पाठिंबा दिला आहे.

काश्मिर मिळविण्यासाठी पाकिस्तानने १९४८ मध्ये आदिवासी पठाणांना जम्मू काश्मिरमध्ये घुसवुन काश्मिरी जनतेला हैराण केले. या पठाणी उच्छादाला पाकिस्तान लष्कराचे व सरकारचे सर्वोतोपरी सहाय्य मिळत होते. परिणामी जम्मू-काश्मिर राज्य हातचे जाणार हे ओळखून राजा हरिसिंग योन आपले राज्य भारतात सामील करून घेतले व त्याचवेळी भारतीय लष्कराला मदतीसाठी बोलाविले. पाकिस्तान पुरस्कृत या हिंसाचाराच्या विरोधात राज्यातील जनता व भारतीय लष्कर एक झाले आणि जम्मू काश्मिर लचके तोडण्यास आलेल्या पाकरूपी लांडग्यांना हुसकावून लावले.

परंतु काश्मिरची चटक लागलेल्या या लांडग्यास स्वस्थ बसवत नाही. १९६५ आणि १९७१ मध्ये काश्मिरवरून भारताची खोडी काढण्याचा पाकिस्तानने प्रयत्न केला. परंतु, त्याचेळी त्यांचे दात घशाखाली घालण्याची कामगिरी भारताने केली. विश्वासघाताने १९९९ साली कारगील ताब्यात घेऊन भारताचा काश्मीर, लेह, लडाख यांच्या समवेत संपर्क तोडण्याचा अयशस्वी प्रयत्न पाकिस्तानने पुन्हा एकदा केला.

उभय देशांत ताश्कंद व सिमला करार, लाहोर करार झाले व त्याद्वारे काश्मिरचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याचे ठरले. परंतु हे सर्व करार व समझौते कागदावर राहिले आणि पाकिस्तानची कृती वेगळीच राहीली. यासंबंधीचा विस्तृत आढावा आहे. पाकिस्तानची वृत्ती प्रत्येक वेळी कशी वाकडी असते, हे दिक्षितांनी अचूकपणे दाखविले आहे.

पाकिस्तानने भारतावर लादलेली युद्धे व कारगील संघर्ष यापासून भारताने कोणते धडे शिकले पाहिजेत, संबंधिही मार्गदर्शन करतांना दिक्षित म्हणतात, काश्मिर प्रश्नी पाकिस्तान भविष्यात वस्तुस्थितीचा विचार करण्याच्या मन:स्थितीत नाही. या प्रश्नी तोडगा निघू शकतो हेच मुळी पाकिस्तानला मान्य नाही. भारताच्या विरोधात देशात, विशेषत: जम्मु काश्मिरमध्ये दहशतवाद लष्करी कारवाया करून राजकीयदृष्ट्या हा विषय सतत पेटता ठेवण्याचा पाकिस्तानने चंग बांधलेला आहे.

तसेच अमेरिका व चीन तसेच इतर देशांतुन अत्याधुनिक शस्त्रे सतत खरेदी करीत असतो. अमेरिका व चीन हे दोन्ही देश सढळ हस्ते पाकिस्तानला सर्वोत्तपरी सहाय्य करीत असतात. त्यामुळे पाकिस्तान अण्वस्त्राच्या बाबतीत भारतापेक्षा कसा वरचढ बनलेला आहे. याबाबत दिक्षित यांनी अभ्यासपूर्ण विवेचन करून देशाचे लक्ष वेधले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्या अन्न वस्त्र धोरणांतील फरकही स्पष्ट करून सांगितला आहे.

आता हे झाल, आतापर्यंत वागणे आपल्या भारत आणि पाकिस्तानचे. आता बघुया २०१८ च आपल्या भारताचे पाकिस्तानशी असलेले नाते. आता भारत पाकिस्तानशी कितीही प्रेमाने वागत असेल तरीही पाकिस्तान हा समजण्याच्या दृष्टीकोनातच नाही आहे. पाकिस्तानने भारतावर हल्ला करायचा त्यावर उत्तर म्हणून भारताने सुद्धा पाकिस्तानवर हल्ला करायचा. यात काय होते त्यांच त्यांनाच माहिती, पण आपल्या देशातील लोकांची वृत्ती मात्र वेगळेची असायची, कदाचीत पाकिस्तानला समजण्याचा हा एकमेव मार्ग असेल कारण पाकिस्तानला हा फक्त हल्ला किंवा भारताशी वैर करण्याच्या मागे सतत लागलेलाच असतो.

असा आहे मग 'भारत आणि पाकिस्तान' म्हणजे असे म्हणता येईल की, 'युद्ध आणि शांतता काळात भारत पाकिस्तान'

'जहाँ प्रेम की भाषा है सर्वोपरि
जहाँ धर्म की आशा है सर्वोपरि
ऐसा है मेरा देश हिंदुस्थान
जहाँ देशभक्ती की भावना है सर्वोपरि'

* * *

Scanned by TapScanner


ध्येयनिश्चिती : आत्मविश्वास व प्रेरणा



कु. दिव्या प्र. सुरजुसे
बी.एस्सी. भाग २

सध्याचे जग तीव्र स्पर्धेचे आहे. दैनंदिन जीवन धावपळीचे आहे. अन्न, वस्त्र, निवारा सर्व मिळणे अवघड झाले आहे. शिक्षण मिळणेही महाग झाले आहे. कुटुंबाचा आकार मात्र लहान होत आहे. आणि कुटुंबाचा आकार मात्र लहान होत आहे. आणि कुटुंबातील नाती मात्र बदलत आहे. सारांश अगदी साध्या माणसासाठी सुद्धा जीवनाची पार्श्वभूमी, जगण्याचे संदर्भ बदलत आहे. संस्कार निरूपयोगी ठरत आहे आणि यश मिळविणे मात्र अटळ होत चालले आहे.

यशस्वी होण्यासाठी अनेक कौशल्य लागतात. या सर्व कौशल्याची मागणी वाढत आहे. पैशाद्वारे हे कौशल्य अंगी येत आहे. ज्या व्यक्तीजवळ जे कौशल्य आहे ते तर मागे पडले पण पैसे असणारा व्यक्ती मात्र विना कौशल्याने पुढे जात आहे हा समाजामधला विरोधाभास ! व्यक्तिमत्व विकास म्हणजे कुणीही उठावे, काहीही करत बसावे असा अर्थ नाही. आपल्याला काय हवे आहे ? का हवे आहे ? कसे मिळणार ? कशासाठी करणार ? केव्हा मिळविणार ? किती मिळविणार ? याची उत्तरे आधी आपल्याजवळ तयार हवीत. कार्यापाठी चिकाटी, ध्येयापोटी सचोटी व प्रयत्नाकाठी हातोटी तर शिखर गाठता येते.



चिकाटी, सचोटी, हातोटी, ध्येय, नम्रता, आशावाद अशा अनेक गुणांचे वैशिष्ट्यपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमहत्व. दोषाचे निर्मूलन आणि गुणक्षमतांचे संवर्धन करून व्यक्तिमत्वचा विकास घडविण्याची इच्छा बागळणाऱ्या प्रत्येकाला वाटते माझा मीच शिल्पकार एवढीच माझी इच्छा आहे.

१६ ते २० वयोगटातील कालखंड म्हणजे जीवनातील वसंत ऋतु. युवकांनी फुलावे, बहरावे, मोहरावे, असा का काळ जे घडत असे वाटते ते घडवून आणण्याच सामर्थ्य या कालखंडात असते. परंतु युवकाला जी गोष्ट करायची आहे त्याचे ज्ञान मात्र नसते. प्रत्यक्षात ते वेगळीच कृती करून बसतो. त्याला वळण लावण्याचं काम हे स्वत: युवकांचे, त्याचबरोबर शिक्षकांचे, पालकांचे आणि समाजाचे आहे.

ध्येयाला उच्चतेचा व उदारतेचा नेहमी सुगंध हवा. जो चांगला वृक्षाचा आश्रय घेतो. त्याला नेहमी चांगली छाया लाभते. यशस्वी व अयशस्वी व्यक्तितील फरक पडतो तो येथे की, व्यक्तीमहत्व संपन्न व सफल करण्यासाठी गरज असते ही जिद्दीची, आंतरिक प्रेरणेची व अथक प्रयत्नांची. ज्ञान घेण्यासाठी प्रत्येक युवकाचा जीव व्याकुळ झाला पाहिजे. कार्य चालु करेण केव्हाही उत्तम पण पूर्ण करणे सर्वोत्तम. मला हे करायचे आहे मी हे करू शकेल व मला हे केलेच पाहिजे म्हणजे महत्वाकांक्षा, आत्मविश्वास व निश्चय या यशांचा व कर्तृत्व त्रिकोणांच्या तीन बाजू आहेत, की ज्यामुळे आपण यशाला गाठू शकतो. भारताला गरज आहे. आता अशा तरूणांची, अशा युवकांची की त्याच्या नसण्यातून नव्या उत्साहाच्या संसार करीत अशा एक विद्युत शक्तीची शक्ती आहे. ज्यांच्या महान विचारांची महानता गगनालाही भेदून जातील.

सर्वच जर परिस्थितीशी झुंज देईल तर मिळणारे श्रेय हे तुमचेच राहील. स्वत:चे भवितव्य ठरविण्याचा क्षण हाच आहे. आपण आपल्या चारित्र्याला कोणत्याही प्रकारचा कलंक न लागू देता काम करा. आपले मन स्वत:च्या मुढीत धरून ठेवा कारण त्याच्याशिवाय काम करणे व्यर्थ आहे. अपयश नसतील तर जीवनाची चव काय राहील ? ज्या काही चुका हातून घडल्या असतील, तर त्या तिथेच ठेवा आणि नव्या उमेदिने संघर्ष करा. पाहा हे जीवन तुमचेच आहे.

* * *

Scanned by TapScanner

मनातील भाव

असाव कुणीतरी
जिवानाचे वाटेवर
आपल्या पाऊलासोबत पाऊल टाकणार
सुख दु:खाचे क्षण
आपसात वाटून घेणारं
असाव कुणीतरी
रखरखत्या उन्हात
आपली सावली बनून चालणारं
दु:खी मनावर
सुखाच्या सारी होऊन बरसणारं
असावं कुणीतरी
गोड गुलाबी थंडीमध्ये
मायेची उब देणारं
हृदयातील रक्ताळलेल्या जखमांना
प्रेमाची फुंकर घालणारं
असाव कुणीतरी आपलं.....



कु. राखी कोठारी
बी.एस्सी. भाग २

Scanned by TapScanner


डॉ. सलीम अली

गौरव कि. सोटे
बी.एस्सी. भाग ३



पेन्सिल, कागद, संयम आणि दुर्बिण एवढ्या थोडक्या साधनानिशी नोकरी वा प्रसिद्धी या तन बडकता पक्षी विज्ञानाची जोपासना करण्यात ज्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्या डॉ. सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ मध्ये झाला. त्यांचे बालपण मुंबईतल्या गिरगावतल्या खेतवाडीत गेले. माता-पिता अुन्निसा व मोईसुद्दीन अब्दुलअली, सलीम तीन वर्षाचा असतांना निर्वतले होते. तेव्हा पट्टीच्या शिकारी असलेल्या मामाच्या घरीच सलीम घोडदौड, शिकार, नेमबाजी करण्यात प्रवीण झाला.

वयाच्या दहाव्या वर्षी अनेक चिमण्या दिसतांना सापडलेल्या एका वेगळ्या पोतकंछी चिमणीला त्याने बाँम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या डॉ. क्युरेटर मिलर्ड साहेबांना दाखविले. त्यांनी खुष होऊन पक्षी सृष्टीची सर्व दालने सलीमला दाखविली. त्यामुळे पक्षीशास्त्रज्ञ होण्याचे सलीमने ठरविले. त्यावेळी भारतामध्ये पक्षीविज्ञान अभ्यासाची सुविधा नव्हती. पण पुढे बर्लिन विद्यापीठात प्रा. स्ट्रेसमन यांच्या हाताखाली पक्षीजीवन व मार्गदर्शनाचा लाभ सलीमला झाला.



नंतर १९३० साली इतर उद्योगधंद्यात जम न बसल्याने अलिबाग येथिल किहेम येथे आल्यावर पक्षी निरीक्षणासोबत, पर्यावरण रक्षण, निसर्ग संशोधन व प्राणी सृष्टीच्या अभ्यासाविषयी सलीम अली प्रयत्नशिल राहिले. मुंबईतील पवई, विहारलेक, भांडूप, विक्रोळी उपनगरांपासून ते संपूर्ण भारत देश, ब्रह्मदेश, अफगाणिस्तान, भूतान, तिबेट, मानसरोवर इत्यादी अनेक ठिकाणच्या पक्षीजीवनाचा जंगले, शेतांचा त्यांनी अभ्यास करून अनेक व्याख्याने, चित्रप्रदर्शने, चर्चासत्रे, घडवून आणली. त्यांच्याच प्रयत्नाने भारतीय कृषी विद्यापीठांनी पक्षी जीवनाचे अभ्यासक्रम सुरू केले व पक्षीशास्त्र अभ्यासाला मान्यता मिळवून भारतात पक्षी अभयारण्ये घोषित करण्यात आली. हे त्यांचे योगदान मोठे आहे. शिवाय सलीम अलींच्याच अथक प्रयत्नामुळे व प्रोत्साहनामुळे भारतात निसर्ग मंडळ, पक्षी निरिक्षण मंडळे, वृक्षमित्र, संघटना निर्माण झाल्यात.

रखरखते ऊन, तप्त रस्ते, खडक डोंगरदऱ्या, खाचखळगे, हिमवर्षाव या सर्वांशी टक्कर देत रोज बारा मैल सैर करीत अलींनी बाया, रूसवेल क्रौंच, बगळे, करकोचे, पाणकावळे, पाणपक्षी, सारस इत्यादी पक्ष्यांच्या जीवनक्रमांचा त्यांनी अभ्यास केला. म्हणूनच त्यांचा 'बर्डमॅन ऑफ इंडिया' असा उल्लेख होऊ लागला. ते म्हणायचे, 'एकवेळ माणसाअभावी पक्षी जगू शकतील पण पक्ष्यांखेरीज माणूस जगु शकणार नाही.' त्यांच्या चिकाटी, धीर, संयम, एकाग्रवृत्ती, तन्मयता, शिस्तप्रियता या गुणांमुळे अने विद्यार्थी त्यांच्या हाताखाली घडले व चमकले.

त्यांची 'द बुक ऑफ इंक्षडयन बर्डस्', 'बर्डस् ऑफ कच्छ', 'इंडियन हिल बर्डस्', 'पिक्टोरियल गाईड टू द बर्डस् इंडिया' अशी अनेक पुस्तके व 'ए फॉल ऑफ ए स्पॅरो' हे आत्मचरित्र गाजले. त्यांच्या या उत्तुंग कामगिरीमुळे असंख्य अवार्डस्, मेडल्स, मानसन्मानांची यादी खुप लांबलचक बनलेली आहे. असे ही कष्टाळू वक्तशीर, निरोगी, ध्येयवेडे, पद्मभूषण डॉ. सलीम अली वयाच्या ९१ व्या वर्षी २० जून १९८७ रोजी अनंतात विलिन झाले.

* * *

Scanned by TapScanner

किनारा

शोधू कुठे असा किनारा
जिथे मिळेल आनंदी वारा
एकट्या जीवनाचा हा सहारा
म्हणूनच वाटतो इतरांपेक्षा
किनाऱ्याची साथ सारखीच असावी
काळानुसार बदलणार नसावी
किनाऱ्याचा प्रवास लांबचा असावा
थकला असेल तर कधी घ्यावा विसावा
किनारा असावा डोंगराच्या कुशीत
जिथे फक्त किलबिलणारे पक्षी हवेत
वाऱ्याची झुळुक गारगार असावी
किनाऱ्याने साथ आपुलकीने द्यावी
आले वादळ तरी तो नाही थांबणार
झालेल्या जखमांवर रडत नाही बसणार
दु:खी असला तरी आनंदी राहतो
जिंकण्यासाठी तो थोडीच न पळतो ?
अशाच किनाऱ्याची साथ जीवनत हवी
पावलोपावली शिकवण त्याचीच घ्यावी
मनातले सगळे दु:ख जाऊन तिला सांगावे
आयुष्यात किनाऱ्यासारखे मोठे होऊन बघावे.

कु. मोनिका सोनोने
बी.एस्सी. भाग ३

Scanned by TapScanner

बाबा



कु. माधुरी रमेश वानखडे
बी.एस्सी. भाग ३

आई घराचं मांगल्य असते
बाबा घराचं अस्तित्व असते.

पण या घराच्या अस्तित्वाला आपण खरचं कधी समजुन घेतल का ? वडिलांना जास्त महत्व असुनही त्यांच्यावर जास्त लिहिले जात नाही, बोलल्या जात नाही. कोणताही व्याख्यान करतांना आईबद्दलच बोलतो, संत महात्मे सुध्दा आईचेच महत्व सांगत असतात.

देवांदिकांनीही आईच्याच ओव्या गायल्या आहे. लेखक, कविंनीही आईचेच तोंड भरून कौतुक केल आहे. चांगल्या गोष्टींनाही आइचीच उपमा दिली जाते. पण बाबांविषयी फारस कुठेच बोलल जात नाही. काही लोकांनी बाब रेखाटले आहे तर ते तापट, व्यसनी, नेहमी मारझोड करणारेच समजतात. १ ते २ टक्के वडिल असे असतीलही पण चांगल्या वडिलांचे काय ? आईकडे अश्रुंचे पाट असतात तर बाबांकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते. तिचे सांत्वनही वडिलच करतात पण रडणाऱ्यांपेक्षा सांत्वन करणाऱ्यावरच नेहमी जास्त ताण पडतो कारण ज्योतिपेक्षा नेहमी समईच तापते ना. मग श्रेय नेहमी ज्योतिलाच का मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहते, पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप मात्र आपण सहज विसरतो. आई सर्वांसमोर सहजपणे रडु शकते. पण रात्री उशीत तोंड खुपसुन रडतो तो बापचं असतो. आई रडे, पण वडिलांना रडता येत नाही. स्वत:चा बाप वारला तरी बापाला रडता येत नाही कारण छोट्या-छोट्या भावंडांना सांभाळायच असते. स्वत:ची आई वारली तरी त्यांना रडता येत नाही. कारण बहिणीचा आधार व्हायचे असते. पत्नी अर्ध्यावर सोडून गेली तरी मुलांसाठी अश्रुंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईंनी शिवाजी घडविला असं अवश्य म्हणावं पण त्याचवेळी शहाजी राजांची होणारी ओढाताणही लक्षात घ्यावी. देवकी यशोदेचे कौतुक अवश्य करावं. पण श्रीकृष्णाला पुरातून डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव सुद्धा लक्षात ठेवावा. राम हा कौसल्येचा पुत्र अवश्य असेल पण पुत्र वियोगाने तडफडून मरण पावला तो दशरथ राजा पिता होता. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपल्या पाहिल्या की त्यांचे प्रेम कळते. त्यांची फाटलेली बनियान पहिली की कळते. आमच्या नशिबाचे भोक हे त्यांच्या बनियानवर पडलेले आहे. त्यांचा दाढीने वाढलेला चेहरा काटकसर दाखवितो. मुलीला ड्रेस घेतील, मुलाला कपडे घेतील. पण त्याच घरातला बाप मात्र जुनी पँटच वापरतो. मुलगा सलुन मध्ये जातो, २० ते ३० रूपये खर्च करतो. मुलगी पार्लरमध्ये जाते. ५० ते ७० रूपये खर्च करते पण त्याच घरातील बाप हा दाढीचा ट्युब संपला तर आंघोळीच्याच साबणाने दाढी करतो.

बाबा आजारी पडले तर लगेच दवाखान्यात जात नाही कारण डॉक्टर एखादा महिना आराम करायला लावतील याची त्यांना भिती असते. मुलीचे लग्न, मुलाचे शिक्षण बाकी असते. पैशाची ओढाताण करून मुलांना मेडिकल इंजिनियरींगला ॲडमिशन दिली जाते. पण सर्वच नाही काही मुले अशी असतात की जे आपले घरून पैसे आले की मित्रांना बारमध्ये पार्टी देतात आणि ज्याबापाने पैसे पाठविले त्याच बापाची टिंगल उडविली जाते. बापाने जे केले ते त्याचे कर्तव्य समजतात. पण स्वत:चे कर्तव्य मात्र विसरतात. आई-बाबा यांच्यामुळेच घराची शोभा वाढते. कुणाचा मुलगा होणे टाळता येत नाही. पण बाप कधीच बाप होणं टाळत नाही. आईच्या हसण्याला अथवा आई होण्याला बापामुळेच अर्थ प्राप्त होतो. कुणालाही निकाल लागल्यावर आईच जवळची वाटते. कारण ती जवळ घेते. कौतुक करते. पण गुपचुप जाऊन पेढ्याचा डबा आणणारा बाप कुणाच्याच लक्षात येत नाही. बाई बाळंतीण झाल्यावर तिच खुप कौतुक केल जाते. पण त्याच दवाखान्यात अस्वस्थ होऊन थांबणारा बाप व त्या बाळाच्या बापाची दखल मात्र कोणीही घेत नाही. चटका बसला, ठेच लागली, फटका बसला तर आई गं ! हा शब्द बाहेर पडतो. पण रस्ता पार करतांना ट्रक जवळ येऊन ब्रेक लावतो तेव्हा बाप रे ! हा शब्द बाहेर पडतो. छोट्या संकटाच्या वेळी आई आठवते. पण मोठ्या संकटाच्या वेळी बाबाच आठवतात. कोणताही बाप आपल्या श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नाही. पण गरिब मुलीच्या उभ्या-उभ्या का होईना एक चक्कर मारतो. मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप, मुलींच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप, घरच्यांसाठी स्वत:ची व्यथा लपवणारा बाप, मुलांनी आपल्याला जाणावा अशी त्यांची इच्छा असते.

Scanned by TapScanner

स्वप्न आणि सत्य

एकदा स्वप्न आणि सत्य यांचे जोरदार भांडण झाले. विषय होता भविष्य घडविण्यात सर्वाधिक सहभाग कोणाचा ? दोघेही खुप भांडले, झगडले पण निर्णय काही होईना. शेवटी या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी ते आपल्या मानसपित्याकडे, ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवाने त्यांना सांगितले. 'ज्या कोणाचे हात आभाळाला टेकतील आणि तरीही त्याचे पाय जमिनीवर असतील, त्याचा भविष्य घडविण्यात निर्णायक सहभाग असतो.'

दोघेही परत आले. स्पप्नाने आधी प्रयत्न केला. एकाच उडीत त्याचे हात आभाळाला टेकले पण त्याचे पाय जमिनीपासून केव्हाच उचलेले गेले होते. नंतर सत्याने प्रयत्न केला. त्याचे पाय कायम जमिनीवर होते पण त्याचे हात आभाळापर्यंत कधीच पोहचू शकले नाही. दोघांनीही खुप प्रयत्न केले पण दोघांपैकी कोणीच यशस्वी होऊ शकले नाही. थकुन परत एकदा ते ब्रह्मदेवाकडे गेले आणि या वेळेस ब्रह्मदेवाने त्यांना सांगितले 'भविष्य घडविण्यात सत्य आणि स्वप्न या दोघांचाही सहभाग तितकाच मोलाचा असतो.'

खऱ्या अर्थाने यशस्वी भविष्य घडवायचे असेल तर स्वप्नाला खांद्यावर उभे राहायला हवे !'

कु. मोनिका सोनोने
बी.एस्सी. भाग ३

दुःख

का रे हे दुःख देवा,
आम्हा लोकरांना दिलं
डोळे उघडताचं,
वडिलांना तू नेलं
वणवण फिरत,
आईच्या मागे राहिलो
चटणी भाकर खाऊन,
कुशीत झोपी गेलो
रक्तांच पाणी करुन,
तिनं लेकरांना शिकविलं
तरी देवा तू तिला,
नेहमी दुःखातच ठेवलं
कसली ही परीक्षा,
तिची चालू होती
दुःखा मागून दुःख येत होती
क्षणभरा जरा थांब देवा,
सुखाचा आस्वाद घेऊ
दे माझ्या माऊलीला
दोन्ही कर जोडूनी करते प्रार्थना,
दुःखाच्या नगरीतून मुक्त कर आम्हा.



कु. राखी कोठारी
बी.एस्सी. भाग २

Scanned by TapScanner

राग काटकसरीने कसा वापरा ?



कु. दिपाली वानखडे
बी.एस्सी. भाग ३

मला एक प्रश्न होता, मला खुप लवकर राग येतो ? नंतर मला पश्चात्तापही होतो, मला माझी ही सवय बदलायची आहे यासाठी मी नेकं काय करावे ज्यांने ही माझी सवय बदलेल.

या प्रश्नाच उत्तर शोधायला मला हे स्वीकाराव लागल की, माझ्यात ही वाईट सवय आहे. तुम्हाला ही अशी सवय असेल त्यासाठी मी शोधलेल उत्तर.

सर्वप्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन, कारण तुम्ही हे मान्य केले आणि तुम्ही आयुष्यात नवे सकारात्मक बदल घडविण्यासाठी उत्सुक आहात. सज्ज आहात, त्यामुळे अर्धा विजय तर इथेच झाला.



मी चुकतोय हे कळणे म्हणजे आपोआपच पुढची चुक टाळणे नाही का ? आता आपल्या प्रश्नाकडे वळुया, मी तर म्हणेन राग चांगला आहे, ह्या धर्तीवर राग चांगला असतो असे म्हणणे योग्य ठरेल. उदा. आपल्याला कचऱ्याचा राग येतो, म्हणून तर आपण स्वच्छता ठेवतो, आपल्याला गरीबीचा राग येतो म्हणून आपण रोज कामावर जातो. लोकांनी केलेल्या अपमानाचा आपल्याला राग येतो म्हणून तर इच्छा असो वा नसो, आपण आपल काम चौखपणे पार पाडतो.

राग ही एक उर्जा आहे, आपल्यालाही राग येतो आणि असामान्य लोकांनाही राग येतो, पण ते लोक आपल्या रागातून निर्माण झालेल्या उर्जा व्यर्थ घालवत नाहीत. तिचा सकारात्मक वापर करून विश्व बदलवून टाकतात.

मार्टीन ल्युथर किंगला राग आला आणि त्याने अमेरिकाच बदलवून टाकली. नेल्सन मंडेलाला कृष्णवर्णीयांवर होणाऱ्या अन्यायाची चीड आली आणि त्यांनी आफ्रिका हादरवून टाकली.

डॉ. बाबासाहेबांनी तेच केले. शिवाजी महाराजांनी सुध्दा तेच केले. आपला राग एकदाच व्यक्त होऊन शांत होऊ दिला नाही. तो निखारा त्यांनी आपल्या हृदयात सतत पेटत ठेवला आणि शेवटच्या श्वासापर्यंत त्यातुन मिळालेलं इंधन आपल्या स्वप्नपुर्तीसाठी वापरले. ते जे करू शकतात ते आपणही करू शकतो की !

फालतु गोष्टीवर रागाराग करून आपली

Scanned by TapScanner

बहुमूल्य उर्जा वाया घालवण्यापेक्षा तिच रूपांतर तीव्र इच्छाशक्तीमध्ये करायला शिकण हीच खरी आनंदाची आणि यशाची गुरूकिल्ली आहे.

जिथे राग येतो अशा परिस्थितीला हाताळण्यासाठी मी वापरलेल्या टिप्स देत आहे.

१) स्वीकार करा - समजा तुम्ही कंम्प्युटरवर खुप महत्वाच काम करत आहात आणि लाईन गेली, आता तुम्ही चिडचिड करून काही फायदा आहे का ? शिव्या देऊन, डोक खराब केल्याने फायदा काहीच होणार नाही, झाल तर नुकसानच होईल. म्हणून लाईन गेली याचा स्वीकार करा, आणि दुसरे एखादे काम शोधा, त्यात रममाण व्हा ! त्याचा आनंद घ्या ! अस समजा तुम्ही ट्रफीकजॅममध्ये अडकला आहात, मग आता किरकिर करून कर्कश हॉर्न वाजवून, आजुबाजुंच्यांशी भांडून काय साध्य होणार आहे का ? त्यापेक्षा कारमध्ये मस्त गाणे लावा आणि आनंद घ्या.

२) स्वत:ला दररोज सुधारा, सिद्ध करा.

कोणी तुमची चुक नसतांना अपमान केला, फसवले किंवा भांडले तर त्यावर जास्त विचार करून वेळ वाया घालवणं म्हणजे मुर्खपणा आहे. नको त्या आठवणी कुरवाळत बसायचे नसते, त्या विसरायच्या असतात पण त्यातुन कमावलेला अनुभव मिळालेला धडा मात्र आयुष्यभर आपोआप लक्षात ठेवायचा.

३) शांत बसा, विसरा.

कधी कधी आपल्याला दुखावणारे आपलेच लोक असतात, अशा लोकांना जबर प्रत्युत्तर देऊन आपणच घायाळ होतो, अशा जखमा होतात ज्या भरण्यासाठी आयुष्य जावे लागते म्हणून अशा वेळी मौन पाळणे सोयीस्कर ठरते. आई वडिल , भाऊ बहिण, बायको मुले, जीवलग मित्र, जवळचे नातेवाईक इतर सगळे यांच्याशी लढाई करून आपण जिंकलो तरी त्या युद्धात आपलेच लोक हरलेले असतात. आपल्या शब्दांनी रक्तबंबाळ झालेले असतात. अशा विजयश्रीचा आनंद साजरा तरी कसा करावा ? म्हणून काही ठिकाणी गप्प राहणे, तिथून निघुन जाणे आणि मौन पाळणे श्रेष्ठ असतं !

४) आभार मानुन आनंदी व्हा -

ज्या व्यक्तिचा राग येतो, त्याच्यात काही चांगले गुणसुद्धा आहेत. त्याने कधी तुम्हाला मदत सुद्धा केली. ते आठवून त्याचे आभार माना. राग पळून जाईल.

५) हसा - कितीही वाईट परिस्थिती असो, त्याकडे पाहून हसा, विनोद बनवा, खळखळून हसा, मजा घ्या, दु:खाची तीव्रता नाहीशी होईल.

जर वरील गोष्टी आत्मसात नाही केल्यात तर हाच राग कदाचित लकवा आणु शकतो, त्याच बरोबर रक्तदाब, मधुमेह, संधिवात, दमा, निद्रानाश व डिप्रेशन देखील आणु शकतो. ठरवा रागाचा वापर कशासाठी करायचा .

Scanned by TapScanner

ग्रंथ वाचनाचे महत्व

कु. मयुरी विजय पाटणे
बी.एस्सी. भाग ३



खळवळलेल्या महासागरात आपल्या जीवननौकेला योग्य ती दिशा दाखविणारे दिपस्तंभ म्हणजे ग्रंथ. जीवनानुभवाने समृद्ध असे ग्रंथ मानवी मनाला अलौकिक आनंदाचा साक्षात्कार घडवितात. ग्रंथ वाचनाने मानवी जीवन समृद्ध होते. मनुष्य सदाचारी सुसंस्कृत बनतो. ग्रंथ हे मनोरंजन, ज्ञान देतात. जीवनाला प्रेरणा देतात. जीवनात कसे वागावे हे ग्रंथ वाचनाने कळते आणि मिळविलेल्या ज्ञानाचा जीवनात उपयोग कसा करावा हे शिकवितात. ग्रंथाच्या माध्यमातून जीवनातील शाश्वत मुल्यांचाआपण शोध घेऊ शकतो आणि ग्रंथ वाचनाने आपल्या बुध्दिला चालना मिळते.

वाचन हे फक्त आपल्याला कच्चा मला पुरवित असते. आपण लेखकाच्या विचाराची पकड समजावून घेतली की ते खऱ्या अर्थाने वाचन होते. वाचनाने प्रकाशाची दारे खुली होतात. ज्ञानाचे कालवे बंधमुक्त होतात. ग्रंथात मानवी जीवनाचे सारे तात्पर्य असल्याने आपल्याला मोठा माणूस व्हावयाचे असेल तर वाचनाशिवाय अन्य तरणोपाय नाही. ग्रंथ वाचनाच्या विरंगुळ्याने माणसाला निरंतन सुख काय आहे ते कळते.



आंधळ्यास जसा प्रकाशाचा अर्थ कळत नाही त्याचप्रमाणे स्वत: विचार न करणाऱ्याला ग्रंथाचा अर्थ कळत नाही.

वाचन हा माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक मानण्यात येतो. प्रत्येकाने जीवनावर बरावाईट परिणाम जर कुणी घडवून आणत असतील तर ते ग्रंथ होय. वाचनाची आवड ही प्रत्येकाने आपल्या बालपणात जोपासली पाहिजे. कारण या संस्कारक्षम वयातच आपल्या पुढच्या आयुष्याची जडणघडण होत असते. वीर पुरूषांच्या चारित्र्याचे वाचन आपल्या विज्ञानविषयक ज्ञानात भर घालते. तर काही ग्रंथातील हृदयस्पर्शी प्रसंग आपल्या मनात साकार हातात.

ग्रंथ म्हणजे ज्ञान मिळविण्याचे एक साधन ग्रंथ म्हणजे आपल्या मनाचे अन्न, आपल्या बंदिस्त मनाची कवाडे उघडून मुक्त विश्वाचे आपल्याला दर्शन घडवितात ते ग्रंथच. ग्रंथ हेच खरे शिक्षण, ग्रंथ म्हणजे आत्म्याचे गवाक्ष या ग्रंथामुळेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत देशाचे राज्य घटनेचे शिल्पकार झाले. त्यांना ग्रंथ हाच एक त्यांच्यासाठी गुरूचे स्थान आहे. आणि गाडगे महाराजांनी सुध्दा हेच सांगितले की वाचनाने आपल्याला मनातील अंधश्रध्दा दूर करता येते.)
समर्थ रादास स्वामींचे एक वचन आहे,

"दिसामासी थोडेतरी लिहावे,
प्रसंगी अखंडित वाचीत जावे"

ग्रंथामुळे मानवी जीवन समृद्ध झालेले आहे. ललित वाङ्मयाच्या नावाने केवळ आनंदच होते असे नव्हे तर अनेकवेळा जीवनाचा अर्थ उमगतो ग्रंथाचे वाचन हा मानवी जीवनातील एक विसावा आहे. या जगातील शाश्वत गोष्ट म्हणजे ग्रंथ.


प्रत्येक प्रकारचे वाङ्मय जो वाचतो तो खरा वाचक नव्हे तर जे उत्तम विचार तो वाचतो व त्या विचारांना आपल्या जीवनाचा एक भाग बनवितो तोचखरा वाचक !

Scanned by TapScanner

स्वप्न

कधी कधी माझे मन
सुसाट धावत असते
स्वप्न माझे आकाशाला
पैलणार नाही इतके असते

काय सांगु तुम्हाला
दिवसातील प्रत्येक क्षणाला
मी स्वप्न बघत असते
स्वप्न माझे आकाशाला
पैलणार नाही इतके असते



आयुष्यात मला खुप काही शिकावं
असे नेहमीच वाटत असते.
पण काय करणार अशा वेळी
नेमकं नशीब साथ देत नसते
स्वप्न माझे आकाशाला
पैलणार नाही इतके असते

मनाला नेहमीच वाटते
आकाशात स्वप्नाचे वारे घेऊन
उंच उंच उडावे पण
काय करणार ..... उडण्यासाठी
आधी पंख असावे लागते
स्वप्न माझे आकाशाला
पैलणार नाही इतके असते

कु. सायली सा. कोठेकर
बी.एस्सी. भाग १

Scanned by TapScanner


जगदीशचंद्र बोस

गौरव कि. सोटे
बी.एस्सी. भाग ३



सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्र, संशोधक, विज्ञानमहर्षी डॉ. जगदीशचंद्र भगवानचंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ साली बंगालमधील विक्रमपरू या गावी झाला. जगदीश लहानपणापासूनच अतिशय चौकस व बुद्धिमान होते. त्यांच्या वडिलांनी त्यांच्या बुद्धीला योग्य वळण देऊन प्रोत्साहन दिले. बालपणी पाठशाळेत जगदीश कोळ्यांच्या मुलांकडून जलचरांच्या, वनस्पतींच्या गोष्टी ऐकत असत त्यामुळे वनस्पती, निसर्ग हाच त्यांच्या आवडीचा विषय झाला.

शालेय शिक्षणानंतर लंडन विद्यापीठाचे बी.एस्सी. व केंब्रिज कॉलेजमधून ते पदवीधर झाले. परत आल्यानंतर कलकत्ताच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात विज्ञान शाखेचे ते प्राध्यापक झाले. १८९६ साली लंडन विद्यापीठाची डॉक्टर ही पदवी मिळवली. बोस यांचे संशोधन कार्य चालूच होते. याचवर्षी त्यांनी बिनतारी तारायंत्राचा शोध लावला. या अपूर्व शोधामुळे त्यांच जगभर प्रसिद्धी झाली.



महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना वसतीगृहाच्या एका कोपऱ्यात त्यांनी छोटासा बगीचा तयार केला होता व वनस्पतींवर निरनिराळे प्रयोग केले. पुढे इंग्लंडला जाऊन वनस्पतीशास्त्राचा खुप अभ्यास केला. तेव्हा जगदीशबाबूंना आढळून आलेकी कृषीजीवन व वनस्पतीजीवन यात खूप साम्य आहे. वनस्पती श्वासोच्छश्वास करतात, रात्री झोप घेतात, विषबाधेने मरतात, गुंगीच्या औषधाने त्यांनाही गुंगी येते, त्यांना स्पर्शाची जाणीव होते, याचा त्यांनी अथक परिश्रमाने शोध घेतला.

पण जगदीशबाबूंचे म्हणणे परदेशी शास्त्रज्ञांना पटत नव्हते. तरीही निराश न होता जिद्दीने, चिकाटीने त्यांनी संशोधन कार्य सुरूच ठेवले. यासाठी लागणारी निरनिराळी यंत्रे त्यांनी तयार केली. १९०० साली पॅरिसे येथे भरलेल्या जागतिक परिषदेत त्यांनी वनस्पतीशास्त्रातील शोधासंबंधी सप्रयोग व्याख्यान दिले. वनस्पतींना सजीव प्राण्यांप्रमाणेच ज्ञानतंतु असतात. हे त्यांनी सिद्ध केले. वनस्पतींची वाढ मोजण्यासाठी त्यांनी 'क्रेस्फोग्राफ' नावाचे यंत्र स्वतः तयार केले व वनस्पती जमिनीतून रस कसा शोषून घेतात, एका सेकंदात वनस्पतींची वाढ किती होते ? हे यंत्राच्या सहाय्याने जगदीशबाबूंनी शास्त्रज्ञांना दाखवून दिले. तेव्हा शास्त्रज्ञांनी थक्क होऊन त्यांचा गौरव केला.

जगदिशबाबू देशभक्त होते. आपला देश संशोधनात मागे राहू नये व येथील मुलांना दुसऱ्या देशात संशोधनाकरिता जावे लागू नये म्हणून कोलकाता येथे बोस विज्ञान संशोधन मंदिर स्थान केले व आपले आयुष्य, सर्व पैसा या प्रयोगशाळेकरिता खर्च केला. रेडिओशास्त्राचे ते खरेखुरे जनक होते. हा शोध स्वत:कडे त्यांनी ठेवला नाही. लंडनच्या रॉयल सोसायटीने १९१३ साली डॉ. जगदिशांचे सिद्धांत प्रसिद्ध केले. विज्ञान क्षेत्रात मोलाचे संशोधनकार्य करून भारताची किर्ती वाढविण्याऱ्या डॉ. बोस यांचे वयाच्या ८० व्या वर्षी, २३ नोव्हेंबर १९३७ साली निधन झाले. 'ज्ञान एका व्यक्तिच्या वा राष्ट्राच्या मालकीचे नसते तर साऱ्या विश्वाच्या मालकीचे असते.' असा संदेश साऱ्या जगाला त्यांनी दिला आहे.

Scanned by TapScanner

मुलगी

जगू द्या मलाही, का मला मारता
माझे दुःख समजूनी का असे करता,
'बाबा' मलाही जगू द्या
ही दुनिया मलाही बघू द्या
उमलत्या कळीला उमलू द्या
फुलाप्रमाणे फुलु द्या आणि
उद्या बघा ही कळी उमलुन
कशी सर्वांना सुगंध देते,
सर्वांचे दुःख समजूनी घेते
तुम्ही म्हणाल तर....
विषसुद्धा अमृत समजुनी पिते



आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही

हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद

धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही

इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहे कशासाठी
काहीच कसला मेळ नाही

क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोड तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या.

कु. दर्शना तिजारे
बी.एस्सी भाग २

Scanned by TapScanner

काही राहीलं तर नाही नां



कु. तेजस्वीनी सु. ढोक
बी.एस्सी. भाग ३

जीवनामध्ये तुम्ही खुप काही मिळवलं असल तरी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर पुढे जात असतांना तेव्हढी हा प्रश्न सर्वांनाच पडतो 'काही राहिल तर नाही नां ?'

